RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ५, अंक २] गुरुवार, फेब्रुवारी १४, २०१९/माघ २५, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.—**महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ यामध्ये सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. . . . . . . | पृष्ठे १-३ |

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दिनांक १४ फेब्रुवारी २०१९.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2019.**

AN ORDINANCE
TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS (AMENDMENT) ACT, 2018.

**सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ यामध्ये सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ यामध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

सन २०१८ चा महा. ६६.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २०१९ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६६ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,— सन २०१८ चा महा. ६६.

(एक) खंड (क) मध्ये, "दिनांक ३१ मार्च २०१६" या मजकुराऐवजी, "दिनांक २६ मार्च २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो मजकूर नेहमीकरिता दाखल केला असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) खंड (ख) मध्ये, "दिनांक ३१ मार्च २०१६" या मजकुराऐवजी, "दिनांक २६ मार्च २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो मजकूर नेहमीकरिता दाखल केला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६६ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** सुधारणा अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(एक) खंड (क) मध्ये, "दिनांक ३१ मार्च २०१६" या मजकुराऐवजी, "दिनांक २६ मार्च २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो मजकूर नेहमीकरिता दाखल केला असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) खंड (ख) मध्ये, "दिनांक ३१ मार्च २०१६" या मजकुराऐवजी, "दिनांक २६ मार्च २०१५" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो मजकूर नेहमीकरिता दाखल केला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६६ याच्या कलम ८ ची सुधारणा.

**४.** सुधारणा अधिनियमाच्या कलम ८ याला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा रीतिने नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीने २६ मार्च २०१५ नंतर जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले असेल, मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींनुसार (१९५९ चा ३.) विनिर्दिष्ट कालावधीच्या आत असे प्रमाणपत्र दाखल केलेले नसेल अशा व्यक्तीने जर अशा विनिर्दिष्ट कालावधीच्या समाप्तीनंतर परंतु, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २०१९ हा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अगोदरच (२०१९ चा महा. अध्या. २.) वैधता प्रमाणपत्र सादर केले असेल ; किंवा ती उक्त अध्यादेश, २०१९ **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत असे प्रमाणपत्र सादर करील तर, अशी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींन्वये अनर्ह ठरली असल्याचे मानण्यात येणार नाही : (१९५९ चा ३.)

परंतु, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २०१९ हा **राजपत्रात** प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी, राज्य निवडणूक आयोगाने अशा व्यक्तीचे रिक्त पद भरण्यासाठी आधीच निवडणूक घेतली असेल किंवा अशी निवडणूक घेण्यासाठी कार्यक्रम घोषित केला असेल त्याबाबतीत, या कलमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.". (२०१९ चा महा. अध्या. २.)

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींची (१९५९ चा ३.) अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २०१९ याद्वारे (२०१९ चा महा. अध्या. २.) सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेले कोणतेही निदेश देता (१९५९ चा ३.) येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

## निवेदन

३१ मार्च २०१६ नंतर घेण्यात आलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या बाबतीत, राखीव जागेवर निवडणूक लढवित असलेल्या व्यक्ती त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या विनिर्दिष्ट कालावधीच्या आत जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र सादर करू शकल्या नाहीत आणि म्हणून त्या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या तरतुदींअन्वये अनर्ह ठरल्याचे निदर्शनास आले होते. अशा व्यक्तींना त्यांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीच्या आत त्यांचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुभा देण्याकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. ६६) याद्वारे, ३१ मार्च २०१६ पासून भूतलक्षी प्रभावाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची कलम १०-१क आणि कलम ३०-१क यांमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

२. असे दिसून आले आहे की, २६ मार्च २०१५ ते ३१ मार्च २०१६ यादरम्यान सुमारे १९,००० ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेण्यात आल्या होत्या. तसेच आणखी असेही दिसून आहे आहे की, उक्त कालावधीमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या बहुसंख्य उमेदवारांनी जरी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले असले तरी, ते विद्यमान कायद्याच्या तत्कालीन तरतुदींनुसार त्यांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत सादर करणे आवश्यक असलेले, वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत.

३. ३१ मार्च २०१६ रोजी किंवा त्यानंतर राखीव जागांवर निवडून आलेल्या व्यक्तींना त्याचप्रमाणे, २६ मार्च २०१५ ते ३१ मार्च २०१६ दरम्यान निवडून आलेल्या व्यक्तींना त्यांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत त्यांचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ याद्वारे तरतूद करण्यात आलेले लाभ देण्यासाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ याची कलमे २ व ३ मध्ये सुधारणा करणे इष्ट वाटते. तसेच, त्या प्रयोजनासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम ८ मध्ये देखील यथोचितरित्या परिणामस्वरूप सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. ६६) यात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, आणि म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १३ फेब्रुवारी २०१९.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल,

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम गुप्ता,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR, DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ५, अंक २] गुरुवार, फेब्रुवारी १४, २०१९/माघ २५, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक २

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayats Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019 (Mah. Ord. II of 2019), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayats Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019 (Mah. Ord. II of 2019), published under the authority of the Governor].

---

**RURAL DEVELOPMENT DEPARTMENT**

Bandhkam Bhavan, 25, Marzban Path,
Fort, Mumbai 400 001, dated the 14th February 2019.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2019.**

*AN ORDINANCE*

*to amend the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018.*

WHEREAS, both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS, the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to amend the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018 for the purposes hereinafter appearing ;

Mah. LXVI of 2018.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely:—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 2 of Mah. LXVI of 2018.

**2.** In section 2 of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018 (hereafter referred to as " the amendment Act"),— Mah. LXVI of 2018.

*(i)* in clause *(a)* for the figures and word "31st March 2016" the figures and word "26th March 2015" shall be substituted and shall always be deemed to have been substituted;

*(ii)* in clause (*b*) for the figures and word "31st March 2016" the figures and word "26th March 2015" shall be substituted and shall always be deemed to have been substituted.

Amendment of section 3 of Mah. LXVI of 2018.

**3.** In section 3 of the amendment Act,—

(*i*) in clause *(a)* for the figures and words "31st March 2016" the figures and word "26th March 2015" shall be substituted and shall always be deemed to have been substituted;

(*ii*) in clause (*b*) for the figures and words "31st March 2016" the figures and word "26th March 2015" shall be substituted and shall always be deemed to have been substituted.

Amendment of section 8 of Mah. LXVI of 2018.

**4.** Section 8 of the amendment Act, shall be re-numbered as sub-section *(1)* thereof and after sub-section *(1)* as so re-numbered, following sub-section shall be added, namely :–

*"(2)* Notwithstanding anything contained in sub-section *(1),* any person who has obtained Caste Certificate or Validity Certificate after the 26th March 2015, but has not filed such certificate within the stipulated period as per provisions of the Maharashtra Village Panchayats Act, shall not be deemed to be disqualified under the provisions of the Maharashtra Village Panchayats Act, if he has already submitted the Validity Certificate to the Competent Authority after expiry of the such stipulated period but before the publication of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019 in the *Official Gazette* or if he submits such certificate within a period of three months from the date of such publication of said Ordinance, 2019 in the *Official Gazette :* III of 1959. III of 1959. Mah. Ord. II of 2019.

Provided that, the provisions of this section shall not apply where the State Election Commission has already prior to the date of publication of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019 in the *Official Gazette* has held elections to fill the vacancy of such person or declared the programme for holding of such election.". Mah. Ord. II of 2019.

Power to remove difficulty.

**5.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Village Panchayats Act, as amended by this Ordinance, the State Government may, as the occasion arises, by an Order publish in the *Official Gazette,* give such directions not inconsistent with the provisions of the Maharashtra Village Panchayats Act, as amended by the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) (Amendment) Ordinance, 2019, as may appear to it to be necessary or expedient for the purpose of the removing of the difficulty.

III of 1959.

III of 1959.

Mah. Ord. II of 2019.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

STATEMENT

In respect of the elections for the Village Panchayats, held after 31st March 2016, it was noticed that the persons contesting on a reserved seat could not submit the Caste Certificate and Validity Certificate within the stipulated period of six months from the date of their election and as such incurred disqualification under the provisions of the Maharashtra Village Panchayats Act. To allow such persons to submit their Caste Certificate and Validity Certificate within a period of twelve months from the date of their election, sections 10-1A and 30-1A of the Maharashtra Village Panchayats Act have been amended retrospectively with effect from 31st March 2016, by the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018 (Mah. LXVI of 2018).

2. It is noticed that, elections to about 19,000 Village Panchayats were held in between 26th March 2015 to 31st March 2016. It is also noticed that a large number of candidates, who are elected during the said period on a reserved seat, though having obtained Caste Validity Certificate, could not submit it within a period of six months from a date of their election, as required to be submitted as per the provisions of the then existing law.

3. To extend the benefits, provided by the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018 to the persons, who are elected on reserved seat on or after 31st March 2016 to submit their Castes Certificate and Validity Certificate within twelve month from the date of election, to the persons who are similarly elected in between 26th March 2015 to 31st March 2016, it is considered expedient to amend sections 2 and 3 of the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018. It is also proposed to consequently amend section 8 of the said Act suitably, for the purpose.

4. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action to amend the Maharashtra Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2018 (Mah. LXVI of 2018) for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 13th February 2019.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASEEM GUPTA,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.